"Techno - Social Excellence"
Marathwada Mitramandal's
Institute of Technology (MMIT)
Accredited with "A" Grade by NAAC
Survey No. 35, Vadgaon Shinde Road, Lohgaon, Pune - 411 047
Approved by AICTE, New Delhi, Recognised by DTE, M.S.Mumbai, Affiliated to Savitribai Phule Pune University
Email : principal@mmit.edu.in Website : www.mmit.edu.in
Tel No. : +91 7447786623 / +91 7447786624 DTE Institute Code : 6203

**NEWS PAPER CLIPPING SERVICE**

Name of the Newspaper: - Sakalh –Pune Today    Page no. 8    Dates: 31/08/2026

सकाळ

# एमएमआयटी विद्यालयाला 'गो-कार्ट' स्पर्धेत यश

**विश्रांतवाडी, ता. ३० :** हिंदुस्तान मोटरस्पोर्ट्सतर्फे भोपाळ येथे आयोजित 'हिंदुस्तान फॉर्म्युला कार्टिंग चॅम्पियनशिप' गो-कार्ट स्पर्धेत लोहगाव येथील मराठवाडा मित्रमंडळ इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. देशभरातील ३५ संघ आणि ६०० हून अधिक विद्यार्थ्यांच्या सहभागासह झालेल्या या स्पर्धेत 'एमएमआयटी'च्या संघाने उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य दाखवले.

इलेक्ट्रिक गो-कार्ट प्रकारात संघाने 'बिझनेस प्लॅन' आणि 'असेंबलिंग व डिसअसेंबलिंग'मध्ये प्रथम क्रमांक पटकावला, तसेच 'ड्रॅग रेस' व 'ट्रॅक्शन'मध्ये उपविजेतेपद आणि 'ऑटोक्रॉस'मध्ये द्वितीय उपविजेतेपद मिळवत सांघिक कामगिरीच्या जोरावर मानाचे 'ओव्हरऑल चॅम्पियनशिप द्वितीय उपविजेतेपद' आपल्या नावावर केले.

विद्यार्थ्यांच्या या यशात हर्ष चौधरी, विठ्ठल फड, आदित्य शिंदे यांसह १४ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. महाविद्यालयाचे अध्यक्ष भाऊसाहेब जाधव, सचिव किशोर मुंगळे, प्राचार्य डॉ. रूपेश भोरटके, यांत्रिकी विभागप्रमुख डॉ. अंजली जोशी आणि प्राध्यापकांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले.

कॅटिया सॉफ्टवेअरच्या मदतीने विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातच गो-कार्टचे डिझाईन तयार केले होते. महाविद्यालयाच्या या कामगिरीबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

Pune, Pune-Today
31/08/2026 Page No. 8

**Librarian**